रासेयो कॉलेज कोड
सी—४१

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, विळदघाट, अहमदनगर —४१४१११

---

## राष्ट्रीय सेवा योजना
## विशेष हिवाळी शिबीर अहवाल

स्थळ— अकोळनेर, ता.नगर जि.अहमदनगर
कालावधी— ०८/०१/२०२४ ते १४/०१/२०२४





<u>दि. ०८ जानेवारी २०२४</u> :— राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरामध्ये गावची स्वच्छता करण्यात आली. मंदिर परिसर, शाळेचा परिसर तसेच ग्रामपंचायत येथील सर्व ठिकाणचा कचरा साफ करुन विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबविले. सर्व परिसर खुलून दिसायला लागला.

<u>दि. ०९ जानेवारी २०२४</u> :— राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरामध्ये गावचा विकास घडवून आणण्याची ताकद असते. व यामध्ये गांवाचा सहभाग व ग्रामस्थांची भूमिका हा भाग विशेष महत्वाचा आहे असे प्रतिपादन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नाईक व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार यांनी केले. अकोळनेर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीराचे उद्घाटन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय नाईक व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार यांचे हस्ते दि. ०९ जानेवारी रोजी झाले, त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, एम.बी.ए. सेंटर आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या संयुक्त

Scanned with OKEN Scanner

विद्यमाने **राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत (N.S.S.)** तिनही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत विशेष हिवाळी शिबाराचे आयोजन अकोळनेर, ता. नगर, जि. अहमदनगर येथे करण्यात आले.



**शिबिरातील उपक्रम –**

- पर्यावरण पूरक पर्यटन
- एनर्जी ऑडीट–विजेचा सुयोग्य वापर करणेविषयी माहिती देणे.
- अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर
- ग्राम स्वच्छता अभियान
- रस्ते देखभाल, दुरुस्ती करणे
- शाळेतील विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना संगणकाविषयी माहिती देणे.
- स्त्री जन्माचे स्वागत करा... जनजागृति.
- लेक वाचवा व लेक शिकवा अभियान
- आरोग्यविषयक अभियान
- वृक्षारोपनाचे महत्व
- गांवक–यांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन
- स्मार्ट व्हीलेज

Scanned with OKEN Scanner



या सात दिवशीय शिबीरामध्ये विद्यार्थ्यांनी विविध अभियांत्रिकी शाखेतील अत्याधुनिक ज्ञानाचा उपयोग करुन ग्रामीण भागामध्ये सुधारणा करुन ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. तसेच या हिवाळी शिबीरात सौर उर्जेचे महत्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची स्वच्छता, जनजागृति, एनर्जी ऑडीट, वृक्षारोपन, आरोग्यविषयक जागृती, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, संगणक प्रशिक्षण, हेल्थ सर्व्हे, गावातील सार्वजनिक स्वच्छतागृहे, अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर, स्मार्ट व्हीलेज व स्वच्छता अभियान यातून गावाचा विकास कसा होईल हे शिबीरातील विद्यार्थी हे त्यांच्या प्रात्यक्षिकांद्वारे करुन दाखविणार आहेत.

या सात दिवशीय शिबीरामध्ये विद्यार्थ्यांना विविध अभियांत्रिकी शाखेतील अत्याधुनिक ज्ञानाचा उपयोग करुन ग्रामीण भागामध्ये सुधारणा करुन ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. तसेच या हिवाळी शिबीरात सौर उर्जेचे महत्व, गावातील पक्क्या डांबरी रस्त्याचा आराखडा, गावाची स्वच्छता, जनजागृति, एनर्जी ऑडीट, वृक्षारोपन, आरोग्यविषयक जागृती, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, संगणक प्रशिक्षण, हेल्थ सर्व्हे, गावातील सार्वजनिक स्वच्छतागृहे, अपारंपारिक उर्जा स्त्रोतांचा वापर, स्मार्ट व्हीलेज व स्वच्छता अभियान यातून गावाचा विकास कसा होईल हे शिबीरातील विद्यार्थी यांनी त्यांच्या प्रात्यक्षिकांद्वारे करुन दाखविले.

गांवचे सरपंच सौ. सविताताई मेहेत्रे, उपसरपंच श्री. मच्छिंद्र जाधव यांनी आपले मनोगतात शिबीराच्या आयोजनाबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे आभार मानून या शिबीरासाठी ग्रामस्थांकडून सर्वतोपरी सहकार्य उपलब्ध करुन देण्याची सदैव तयारी असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. सुनिल मांढरे यांनी केले व आभार प्रदर्शन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. सौ प्रतिभा गायके यांनी केले.

यावेळी ह.भ.प. विलास महाराज, न्यु आर्टस कॉमर्स व सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. विजय जाधव, बँक ऑफ महाराष्ट्रचे मॅनेजर श्री. ओरे व सौ. भोर ताई या ग्रामस्थांबरोबर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी . प्रा. निळकंठ देशपांडे, प्रा. सुनिल मांढरे, प्रा.गणेश डहाणे, प्रा. बी.डी.कानवडे, प्रा. प्रसाद रसाळ व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतिभा गायके व श्री. रवि शेलार आदींनी सहकार्य केले.

या शिबीराचे यशस्वी आयोजन व नियोजन कार्यकारी अधिकारी प्रा. संजय जोशी, प्रा. अजित नांगरे, प्रा. डॉ. एम.पी. शर्मा यांनी केले. तसेच या शिबीरात जवळपास १२५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

Scanned with OKEN Scanner

या शिबीरासाठी डॉ. विखे पाटील फौंडेशनचे विश्वस्त व मुख्य कार्यकारी अधिकारी मा.खासदार डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. बी. सदानंदा, डायरेक्टर (टेक्निकल) डॉ. पी.एम.गायकवाड, विखे पा. फौंडेशनचे डेप्युटी डायरेक्टर–टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे तसेच अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. उदय पी. नाईक, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.वाय. पवार, व एम.बी.ए. सेंटरचे डायरेक्टर डॉ. संजय धर्माधिकारी यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले.

या हिवाळी शिबीरासाठी सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले.

<u>दि. १० जानेवारी २०२४</u> :–

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी दिवशी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध प्रकारच्या रक्त तपासण्या, कॅन्सर टयुमर टेस्ट, डौळे तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया सिव्हील हॉस्पिटल व हिंदसेवा लॅब यांच्या सहकार्याने आयोजन करण्यात आले. यामध्ये गावातील तरुण, वयोवृध्द व्यक्ति तसेच जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवकांची विविध रक्ततपासण्या केल्या गेल्या. जवळपास ५०० गावक–यांनी यामध्ये सहभाग घेवून आरोग्य शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



चार वाजता अवयवदानचे जीवनातील महत्व यावर डॉ. जाधव, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांचे व्याख्यान झाले. तसेच सर्व गांवकरी व विद्यार्थ्यांमध्ये अवयवदानाचे परिपत्रक वाटण्यात आले.




पाच वाजता अवयवदान जनजागृति रॅली गावामधून काढण्यात आली.




महाराष्ट्र राज्य महिला आयोग व स्नेहालय संचलीत सक्षमा प्रकल्प ' ती ' च्या आधारासाठी महिला जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

Scanned with OKEN Scanner




उत्तर जिल्हा समन्वयक  राष्ट्रीय सेवा योजना डॉ. फलफले यांनी विशेष शिबीराला अकोळनेर येथे सदिच्छा भेट दिली.

दिवसभरातील कामांचा आढावा व नंतरच्या दिवशीच्या कामाचे आयोजन करण्यात आले.

<u>दि. ११ जानेवारी २०२४</u> :—

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी गांवातील श्रमदान, जलस्त्रोत साफसफाई तसेच धार्मिक स्थळांची स्वच्छता हा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमामध्ये गावचे गांवकरी सुध्दा सहभागी झाले होते.



Scanned with OKEN Scanner

डॉ. कुकरेजा, विभागप्रमुख, मायक्रोबॉयलॉजी, न्यु आर्टस, कॉमर्स व सायन्स कॉलेज, अहमदनगर यांचे लेक वाचवा, देश वाचवा यावर व्याख्यान संपन्न झाले. यामध्ये स्त्री भ्रूणहत्या न करण्याची शपथ तसेच स्वच्छतेची शपथ स्वयंसेवकांनी घेतली.



Scanned with OKEN Scanner

सायंकाळी पाच वाजता "लेक वाचवा, देश वाचवा" संबंधी रॅली काढण्यात आली.





<u>दि. १२ जानेवारी २०२४</u> :—

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी गांवातील श्रमदान, स्वच्छता अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय तसेच गावातील विविध परिसरातील स्वच्छता करण्यात आली.



यानंतर स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व प्रा. सचिन राऊत, कोओर्डीनेटर, साऊथ वेस्ट झोन, सुदर्शन न्यूज चॅनल उपस्थित होते. तसेच या दिवशी राष्ट्रीय युवा दिन म्हणून स्वामी विवेकानंदांचे विचार यावर प्रा. सचिन राऊत यांचे व्याख्यान झाले.

Scanned with OKEN Scanner




यावेळी प्रा. सचिन राऊत यांनी मुलांना स्वामी विवेकानंद व त्यांचे जीवन समजावले व "युवकांचे राष्ट्राच्या उभारणीत योगदान" या विषयावर अमूल्य मार्गदर्शन केले.



**<u>दि. १३ जानेवारी २०२४</u>** :—

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी गांवातील वृक्षारोपन मंदिर परिसर, जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत कार्यालय यामध्ये करण्यात आले. तसेच अभियांत्रिकीच्या मुलांनी जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले. तसेच ज्युनिअर कॉलेज व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना करिअर गायडन्सवर स्वयंसेवकांनी मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा परिषद शाळेतील एनर्जी ऑडीट केले.

Scanned with OKEN Scanner



सुभेदार श्री. नारायण राऊत यांचे लाईन ऑफ कंट्रोल व खडतर प्रशिक्षण यावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले.




संविधान जनजागृति रॅली काढण्यात आली.




Scanned with OKEN Scanner

जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना सौ. भारती दानवे यांनी शिबीरास सदिच्छा भेट दिली.




<u>दि. १४ जानेवारी २०२४</u> :—

कार्यक्रम पत्रिकेनुसार सकाळची दिनचर्या पूर्ण करुन अल्पोपहारानंतर सर्व प्राध्यापक व सर्व मुले यांनी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेमोरिअल हॉस्पिटल व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सांधेरोपन व मणक्याचे आजार तसेच हाडांतील ठिसूळपणा या विषयाच्या विविध चाचण्या व शिबीर गावक—यांसाठी आयोजीत केले. त्यासाठी जवळपास ३०० गावक—यांनी सहभाग घेतला व आरोग्य तपासणी करुन घेतली.



Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवकांनी व्यसनमुक्तीवर पथनाटय गावक–यांसमोर सादर केले. तसेच गावातील लहान मुलांनी पोवाडा गायन व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला.




डॉ. निवेदिता माने, आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद आरोग्य केंद्र, चास यांचे आरोग्याविषयी जागरुकता या विषयावर व्याख्यान झाले.




Scanned with OKEN Scanner

इ. १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी वेळेचे नियोजन, पेपर कसा सोडवावा याबद्दल स्वयंसेवकांनी मार्गदर्शन केले.



**दि. १४ जानेवारी २०२४** :— या शिबीराची सांगता दि. १४ जानेवारी २०२४ रोजी झाली. यावेळी सरपंच सौ. सविताताई मेहेत्रे व ग्रामविकास अधिकारी श्री. अशोक बोरुडे व संत दासगणु महाराज मंदिर समिती सदस्य श्री. सतिश गायकवाड तसेच राष्ट्रवादी महिला तालुका अध्यक्ष सौ. भोर मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



तसेच यावेळी सौ. सविताताई मेहेत्रे, सरपंच, अकोळनेर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीरामध्ये सहभागी स्वयंसेवकांनी केलेल्या श्रमदानाचे व त्यांच्या शिस्तीचे कौतुक केले.

ग्रामविकास अधिकारी श्री. अशोक बोरुडे यांनी ग्रामपंचायतीमार्फत राबविल्या जाणा—या विविध उपक्रमाची माहिती दिली तसेच गावासाठी पाणी व्यवस्थापन तसेच हागणदारी मुक्त गांव याबद्दलचे उपक्रम यांची सविस्तर माहिती दिली व ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकामार्फत यशस्वीरित्या राबविण्यासाठी पुढील शिबीरामध्ये करण्याचे नियोजन याविषयी गावाचा प्रस्ताव मांडला.

Scanned with OKEN Scanner



संत दासगणु महाराज मंदिर समिती सदस्य श्री. सतिश गायकवाड यांनी स्वयंसेवकांची राहण्याची व्यवस्था मंदिरामध्ये करुन दिली. तसेच मुलांना गावक—यांसमवेत संत दासगणु महाराजांच्या आरतीचा लाभ सातही दिवस मिळाला त्याबद्दल कार्यक्रम अधिकारी यांनी त्यांचा सांगता समारोहात सत्कार केला.

सौ. सविताताई मेहेत्रे, सरपंच, अकोळनेर यांनी सर्व स्वयंसेवकांना संक्रांतीनिमित्त शुभेच्छा देवून तिळगूळाचे वाटप केले. तसेच महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजीत केला व महिला कार्यक्रम अधिकारी यांचा सत्कार केला.

कार्यक्रम अधिकारी प्रा. संजय जोशी यांनी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व मंदिर समिती व गावक—यांच्या सहकार्याबद्दल तिन्ही महाविद्यालयांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त केले व यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर गावामधून शिबीराचे अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे प्रस्थान झाले.

Program officer
National Service Scheme
Dr. Vithalrao Vikhe Patil College of Engineering,
Ahmednagar

(डॉ. निळकंठ देशपांडे )

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

Principal
College of Engineering
Ahmednagar

( डॉ. उदय पी. नाईक )

प्राचार्य
अभियांत्रिकी महाविद्यालय, अ.नगर

Scanned with OKEN Scanner